**तहसिलदार संवर्गातील अधिका-यांची बदलीने पदस्थापना**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
शासन आदेश क्र.बदली-२०२५/प्र.क्र.२८६/आस्था-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २२ एप्रिल, २०२६

**संदर्भ**:- महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५

**शासन आदेश:-**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४(४) व ४(५) मधील तरतुदींनुसार श्री.एस.एस. हांदेश्वर, तहसिलदार पाथरी, जि.परभणी यांची त्यांच्याविरूध्द प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या मान्यतेनुसार प्रशासकीय कारणास्तव तसेच सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने कार्यरत पदावरून या आदेशान्वये बदली करण्यात येत आहे. श्री.एस.एस. हांदेश्वर, तहसिलदार यांच्या बदलीने पदस्थापनेचे आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.

२. सदरील आदेश तात्काळ अंमलात येत असून श्री.एस.एस. हांदेश्वर, तहसिलदार यांना कार्यरत पदावरून या आदेशान्वये एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे. तसेच श्री.एस.एस. हांदेश्वर, तहसिलदार यांनी त्यांच्या पदस्थापनेबाबतचे सविस्तर आदेश निर्गमित होईपर्यंत शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, दि.०१.१२.२०२३ नुसार संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयात रूजू होवून दैनंदिन उपस्थिती नोंदवावी.

३. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी तहसिलदार पाथरी, जि.परभणी या पदाचा कार्यभार शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत इतर कार्यक्षम अधिकारी यांच्याकडे आजच सोपवावा व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्र.२०२६०४२२१५५२१७४४१९ असा आहे. हे शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHESH ASHOKRAO VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.04.22 16:10:52 +05'30'

**(महेश वरूडकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर.

**प्रत,**

- मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
- मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास/गृहनिर्माण) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
- मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क/क्रीडा व युवक कल्याण/ अल्पसंख्याक विकास आणि औकाफ) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
- मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
- संबंधित जिल्हाधिकारी.
- प्रधान महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), मुंबई/ नागपूर.
- संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
- संबंधित अधिदान व लेखा अधिकारी.
- संबंधित आहरण व संवितरण अधिकारी.
- अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-३२.
- संबंधित तहसिलदार (संबंधित विभागीय आयुक्त यांचेमार्फत).
- उप सचिव (आस्था-३) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
- निवडनस्ती (आस्था-३).